RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक १७] मंगळवार, फेब्रुवारी १८, २०२०/माघ २९, शके १९४१ [पृष्ठे १२४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ५१

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## नगर विकास विभाग

४ था मजला, मंत्रालय (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२०.

## अधिसूचना

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२०

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्र.पीसीसी-३०१९/प्र.क्र.३८१/नवि-२२.—महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५६ (अ) व या अधिनियमातील लागू असलेल्या अन्य तरतुदीद्वारे मिळालेल्या शक्तींचा वापर करून, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवा प्रवेश नियम तसेच तत्संबंधात यापूर्वी करण्यात आलेले ठराव व आदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-४५७ (३) अंतर्गत महानगरपालिकेमधील विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित नियम करीत आहे :—

## नियम

**१. संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती:-**

(१) या नियमांना "पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२०" असे संबोधण्यात येईल.

(२) हे नियम अंतिमरित्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

(३) हे नियम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व मंजूर पदांवरील नियुक्त्यांना लागू होतील; मात्र, अन्यथा नमूद केले नसल्यास, अंशकालिक स्वरूपाच्या नियुक्त्या, कंत्राटी पद्धतीने किंवा रोजंदारी तत्त्वावरील नियुक्त्या तसेच मानसेवा स्वरूपाच्या नियुक्त्यांना लागू होणार नाहीत.

**२. व्याख्या:-**

विषय किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास, या नियमांसाठी.-

(१) "शासन" म्हणजे, महाराष्ट्र शासन.
(२) "आयोग" म्हणजे, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.
(३) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.
(४) "महानगरपालिका" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्माण केलेली "महानगरपालिका."
(५) "महापौर" म्हणजे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर.
(६) "आयुक्त" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-३६ अन्वये शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.
(७) "सक्षम प्राधिकारी" म्हणजे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त.
(८) "नियुक्ती प्राधिकारी" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५३ च्या पोटकलम-(१) ते (३) च्या तरतुदींप्रमाणे नियुक्ती देण्यास सक्षम असलेला अधिकारी.
(९) "निवड प्राधिकारी" म्हणजे, या नियमातील परिशिष्ट-(१) मध्ये विनिर्दिष्टीत केलेली कर्मचारी निवड समिती.
(१०) "अधिकारी/कर्मचारी" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण-४, कलम-५१ (४) अन्वये नेमणूक केलेले अधिकारी/कर्मचारी. परंतु, यात रोजंदारीवर, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कंत्राटी पद्धतीने, तसेच अंशकालीन व मानद स्वरुपी नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.
(११) "संवर्ग" म्हणजे, एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेल्या "कायम त्याचप्रमाणे हंगामी" शासनमान्य पदांचा समूह.
(१२) "कलम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम.
(१३) "परिशिष्ट" म्हणजे, या नियमांना जोडलेले परिशिष्ट.
(१४) "जोडपत्र" म्हणजे, या नियमांच्या शेवटी जोडलेली जोडपत्रे.
(१५) "अनुसूची" म्हणजे, या नियमांच्या जोडपत्राला जोडण्यात आलेली अनुसूची.

(१६) "विभागीय परीक्षा" म्हणजे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेली व या नियमांच्या परिशिष्ट-(३) मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

(१७) "पदवी" म्हणजे, संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा भारतातील राज्य विधिमंडळाद्वारे विधि संस्थापित असलेले कोणतेही विद्यापीठ किंवा संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा तत्सम अधिनियमाद्वारे स्थापना करण्यात आलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेतून प्राप्त केलेली पदवी.

(१८) "पदविका" म्हणजे, संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा भारतातील राज्य विधिमंडळाद्वारे विधि संस्थापित असलेले कोणतेही विद्यापीठ किंवा तंत्र शिक्षण मंडळ किंवा संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा तत्सम अधिनियमाद्वारे स्थापना करण्यात आलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेतून/तंत्र निकेतनातून प्राप्त केलेली पदविका.

(१९) "व्यावसायिक अर्हता (Professional Qualification)" म्हणजे, अग्निशमन अभियांत्रिकी पदवी (B.E. Fire), अग्निशमन अभियांत्रिकी उच्च शिक्षा पदविका (Advanced Diploma in Fire Engineering), अग्निशमन अभियांत्रिकी पदविका (Diploma in Fire Engineering) उप अग्निशमन अधिकारी हे पाठ्यक्रम [राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण अकादमी, मुंबई मधून उत्तीर्ण झालेले अथवा Institute of Fire (U.K.) किंवा (India) या संस्थेमधून M.I. (Fire) किंवा Grade (I) (Fire) उत्तीर्ण झालेले.]

(२०) "स्वीयेतर सेवा (Foreign Service)" म्हणजे, ज्या सेवेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याला त्यांचे वेतन व भत्ते महानगरपालिकेच्या निधी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही साधनाद्वारे मिळतात, अशी सेवा.

(२१) "मुलाखत" म्हणजे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदावरील/पदांवरील नियुक्तीकरिता अर्ज केलेल्या उमेदवाराची सक्षम निवड प्राधिकाऱ्याने किंवा त्याच्या स्वत:च्या सदस्यांमधून अशा प्राधिकरणाने नामनिर्देशित केलेल्या एखाद्या समितीने आणि ज्या पदांकरिता त्याने किंवा तिने अर्ज केला आहे, त्या पदांवरील नियुक्तीकरिता निवड करण्यासाठी अशा रितीने मुलाखत घेण्यात आलेल्या उमेदवारांची योग्यता किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने आणि अशा मुलाखत घेण्यात आलेल्या उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे अनुक्रम लावण्यासाठी घेतलेली मुलाखत, असा आहे.

(२२) "समतुल्य/समकक्ष अर्हता" म्हणजे, संबंधित अर्हतेला समान म्हणून शासनाकडून जाहीर केलेली अर्हता, असा आहे आणि याबाबत कोणताही संदेह/वाद उद्भवल्यास शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(२३) "मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था" म्हणजे, शासनाची मान्यता असलेली संस्था, असा आहे.

(२४) "माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेली शालांत प्रमाणपत्र परीक्षा, असा

आहे आणि यात शासनाने या परीक्षेशी समान म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही इतर परीक्षेचा समावेश आहे.

(२५) "औद्योगिक प्रशिक्षण संस्था" म्हणजे, राज्य शासनाने विविध प्रकारच्या औद्योगिक व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यासाठी तयार केलेले औद्योगिक प्रशिक्षण केंद्र.

(२६) "समय श्रेणी वेतन" म्हणजे, असे वेतन जे, या नियमात घालून देण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीच्या अधीन किमान पासून कमाल पर्यंत नियतकालिक वेतनवाढीने वाढते.

(२७) "लेखी परीक्षा" म्हणजे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून, योग्य रितीने नामनिर्देशित करण्यात आलेल्या एखाद्या अभिकरणाकडून, पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या योग्यतेचे किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या प्रयोजनाकरिता घेतलेली परीक्षा आणि त्या लेखी परीक्षेतील उमेदवारांच्या कामगिरीचा संबंध असेल, तेथवर त्यांच्या गुणवत्तेचा क्रम लावण्याच्या उद्देशाने घेतलेली परीक्षा, असा आहे.

(२८) "व्यावसायिक परीक्षा" म्हणजे, उमेदवारांच्या तांत्रिक कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने एखाद्या अभिकरणाकडून अथवा शासकीय/ निमशासकीय कार्यालयामार्फत आयोजित केलेली परीक्षा, असा आहे.

(२९) "निवड समिती अध्यक्ष" म्हणजे, कर्मचारी/अधिकारी निवड समितीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी निवड समिती अध्यक्ष म्हणून नियुक्त केलेले अधिकारी.

(३०) "एकीकृत संवर्ग" म्हणजे, विविध पदांच्या कर्तव्याचे स्वरुप, ती पदे धारण करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी यांचा सारासार विचार करून सेवा नियमासाठी एकीकृत केलेला संवर्ग.

(३१) "अर्हताप्राप्त कर्मचारी" म्हणजे, नियमाच्या परिशिष्ट-(२) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी.

या नियमांत वापरण्यात आलेल्या, परंतु व्याख्या न केलेल्या शब्द किंवा शब्द समुहांचा अर्थ अधिनियमात दिल्यानुसार असेल.

**३. <u>सेवांचे वर्गीकरण (Classification of Services)</u>:-**

**(३.१) <u>प्रशासकीय सेवा</u>:-** सामान्य प्रशासन, परिमंडळ कार्यालय प्रशासन, प्रभाग प्रशासन, महसूल, कर व महानगरपालिका सचिवालय अंतर्गत असलेल्या विभागातील सेवा या "प्रशासकीय सेवा" संबोधण्यात येतील.

**(३.२) <u>लेखा सेवा</u>:-** महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवस्थापनाशी संबंधित (अर्थसंकल्प, लेखा, लेखा परीक्षण, लेखा आक्षेप निराकरण व खर्च व्यवस्थापन इत्यादी) सेवांतील पदांना "लेखा संवर्ग" असे संबोधले जाईल व अशा पदांची सेवा "लेखा सेवा" संबोधण्यात येईल.

**(३.३) <u>तांत्रिक सेवा</u>:-** ज्या पदावरील नियुक्तीसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी/पदविका, सांविधिक विद्यापीठ/अभिमत विद्यापीठ/राज्य तंत्रशिक्षण मंडळ (Board of Technical Education) वा केंद्रीय तंत्र शिक्षण मंडळ (Board of Central Technical Education), तंत्र शिक्षण

परिषद (Technical Council) यांचेमार्फत चालविले जाणारे विविध तांत्रिक व अभियांत्रिकीविषयक अभ्यासक्रम अशी किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल अशा पदांची सेवा “तांत्रिक सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.४) <u>वैद्यकीय सेवा</u>:-** ज्या पदावरील नियुक्तीसाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वैद्यकीय शास्त्राचा पदवीधारक, पदव्युत्तर पदवीधारक/पदविकाधारक, तसेच मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया, आयुष वा तत्सम आयुर्वेदिक कौन्सिल, युनानी, होमिओपॅथिक कौन्सिल यांच्याकडील नोंदणी ही किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल, अशा पदांची सेवा “वैद्यकीय सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.५) <u>निमवैद्यकीय सेवा</u>:-** वैद्यकीय सेवेतील पदांना सहाय्यकारी असणाऱ्या पदांच्या संवर्गाला, उदा.अधिसेविका, सहाय्यक अधिसेविका, परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ, भौतिकोपचार तज्ञ, व्यवसायोपचार तज्ञ, दंत आरोग्य तज्ञ, औषध निर्माता/औषध निर्माण अधिकारी इत्यादी पदांच्या सेवेला “निमवैद्यकीय सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.६) <u>सार्वजनिक आरोग्य सेवा</u>:-** घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित अधिकारी/ कर्मचारी- उदा. मुख्य स्वच्छता अधिकारी, उप मुख्य स्वच्छता अधिकारी, स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, उप स्वच्छता निरीक्षक, मुकादम आणि सफाई कामगार व तत्सम पदांच्या सेवेला “सार्वजनिक आरोग्य सेवा” संबोधण्यात येईल.

**(३.७) <u>अग्निशमन संवर्ग आणि सेवा</u>:-** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम, २००७ मध्ये समाविष्ट असलेल्या सेवेला “अग्निशमन सेवा” संबोधण्यात येईल.

**४.** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवांचे गट पुढीलप्रमाणे असतील :-

(१) अधिकारी- गट-अ व गट-ब.

(२) कर्मचारी- गट-क व गट-ड.

**५. <u>नेमणुकीची पध्दत व अर्हता</u> :-**

**(५.१) <u>नियुक्तीची पद्धत</u> :-** महानगरपालिकेतील विविध पदांवर नियुक्तीची कार्यपद्धती परिशिष्ट-(१) मध्ये विहित केल्यानुसार व शिक्षण, अनुभव इत्यादी आवश्यक अर्हता परिशिष्ट-(२) मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील. नियुक्तीची पद्धत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५४ व अनुसूची-ड मधील प्रकरण-३ नुसार असेल.

**(५.२) <u>भारतीय नागरिकत्व आणि महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र</u> :-** उमेदवार भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास (Domicile) करीत असल्याबाबत त्याने

सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबाबत जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**(५.३)** **<u>संगणक हाताळणी/वापराबाबतच्या ज्ञानाची आवश्यकता</u> :-** परिशिष्ट-(२) मध्ये विहित केलेल्या अर्हतेव्यतिरिक्त वाहनचालक आणि श्रेणी-४ ची पदे वगळून, इतर सर्व पदांवरील नेमणुकीसाठी/पदोन्नतीसाठी शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल, असे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान, एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल.

**(५.४)** **<u>वयोमर्यादा</u>** :- महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी किमान वयाची अट १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाचे प्रचलित नियम व त्या अनुषंगाने वेळोवेळी काढण्यात आलेले शासन निर्णयात नमूद केल्यानुसार असेल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत विहित प्रक्रियेद्वारे व शासनमान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा लागू नसेल. जेथे कमाल वयोमर्यादा विहित केली नसेल, अशा पदांच्याबाबत ती प्रचलित शासन धोरणाप्रमाणे असेल. सामाजिक आरक्षण लागू असणाऱ्या प्रवर्गाकरिता प्रचलित शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.

**(५.५)** **<u>पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण</u> :-**

**(क)** नामनिर्देशन वा पदोन्नतीचे प्रमाण परिशिष्ट-(२) मध्ये संबंधित पदासमोर दर्शविल्यानुसार असेल. तथापि, ज्या पदासमोर असे प्रमाण विहित केलेले नसेल, अशा पदावरील नियुक्तीसाठी पदोन्नती व नामनिर्देशनाचे प्रमाण ५०:५० असे राहील.

**(ख)** पदोन्नतीच्या साखळीतील एकाकी पद सामान्यत: पदोन्नतीने भरण्यात येईल. तथापि, विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद नामनिर्देशन अथवा प्रतिनियुक्तीने भरता येईल.

## ६. <u>पदोन्नतीने नेमणूक करणे</u>:-

पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, ज्येष्ठता-नि-पात्रता या तत्त्वावर अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांमधून केली जाईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग-१ ची पदे पदोन्नतीने भरताना, त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील.

## ७. <u>प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक</u> :-

या नियमांमध्ये विहित केलेल्या अर्हतेनुसार महानगरपालिकेतील ज्या पदांवर प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक करण्याची तरतूद आहे, अशी पदे केंद्र शासन, राज्य शासन, इतर स्थानिक स्वराज्य संस्था व स्थानिक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरता येतील. सदर प्रतिनियुक्तीचा कालावधी हा शासनाच्या प्रचलित नियमापेक्षा अधिक असणार नाही. सदर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपताच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची प्रतिनियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

**८. <u>महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या</u> :-**

महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ तसेच या संदर्भात वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार करणे आवश्यक राहील.

**९. <u>एका महानगरपालिकेतून दुसऱ्या महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती</u> :-**

या नियमात अन्यत्र काहीही नमूद केले असले तरी, एका महानगरपालिकेतील एखाद्या कर्मचाऱ्याने अन्य महानगरपालिकेतील समसंवर्गीय पदावर बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास, अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकांतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील, अशा अटी व शर्तीवर, खालील बाबींच्या अधीन राहून बदलीने नियुक्ती देता येईल :—

**अ)** पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्तीकरिता राखून ठेवण्यात आलेल्या समसंवर्गीय व समान वेतन श्रेणीच्या रिक्त पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

**ब)** अशी नियुक्ती झाल्यानंतर, त्या पदधारकाची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वांत कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

**क)** गट-अ आणि गट-ब मधील अधिकाऱ्यांच्या बाबतीत अन्य महानगरपालिकेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत बदलीचा निर्णय दोन्ही महानगरपालिकांच्या परस्पर संमतीने निश्चित अटी व शर्तीवर शासन मान्यतेने घेतला जाईल.

**ड)** केवळ विहित प्रक्रियेद्वारे व शासनमान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांचाच विचार केला जाईल.

**१०. <u>परीविक्षाधीन कालावधी</u>:-**

गट-अ आणि गट-ब मध्ये नामनिर्देशन/सरळसेवेने नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी परीविक्षाधीन कालावधी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा असेल. राज्य शासनाच्या लागू असलेल्या अटी-शर्तीनुसार परीविक्षाधीन कालावधी पूर्ण केल्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच अशा उमेदवारांचे परीविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमूद करून परीविक्षा कालावधी पुढील १ वर्षापर्यंतच वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**११. <u>भाषा परीक्षा, विभागीय परीक्षा व प्रशिक्षण</u>:-**

महानगरपालिका सेवेतील पदांवर नेमणूक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी:-

(१) विहित करण्यात येतील अशा भाषा परीक्षा आणि/किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहित नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक असेल.

(२) परिशिष्ट-(३) अन्वये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक असेल.

(३) वेळोवेळी ठरवून देण्यात येईल असे, सेवा प्रवेशपूर्व आणि/किंवा सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणेसुद्धा आवश्यक असेल.

**१२. <u>महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता</u>:-**

एखाद्या व्यक्तीस:-

**(क)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५९ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल, किंवा

**(ख)** महानगरपालिकेच्या सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

**(ग)** ज्यामध्ये नैतिक अध:पतनाचा समावेश होईल, अशा अपराधाबद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

**(घ)** जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असतील आणि स्त्री उमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पत्नी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

**(च)** महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार अनर्ह ठरत असेल, किंवा

**(छ)** न्यायालयात ज्या गुन्ह्यासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्ह्यासाठी सहा महिन्याहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती किंवा

**(ज)** महानगरपालिकेच्या सेवेत असताना सिद्धापराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल,

अशी व्यक्ती महानगरपालिकेच्या सेवेत नेमणूक देण्यास वा नेमणूक चालू ठेवण्यास अपात्र समजली जाईल.

**१३. महानगरपालिका सेवेतील पदांवर आरक्षण:-**

महानगरपालिका सेवेतील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल. यामध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण (सामाजिक आरक्षण), विशेष/समांतर आरक्षण, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, दिव्यांग, महिला, खेळाडू इत्यादीसाठीच्या आरक्षणाचा समावेश असेल.

**१४. शारीरिक पात्रता प्रमाणपत्र आणि चारित्र्य पडताळणी अहवाल:-**

महानगरपालिका सेवेतील कोणत्याही पदावरील नामनिर्देशनाने नियुक्ती,

(अ) महानगरपालिकेच्या सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, आणि

(ब) उमेदवाराच्या पूर्वचारित्र्य पडताळणीबाबत (Verification of Antecedents) पोलीस विभागाचे/सक्षम प्राधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर केली जाईल.

**१५. परीक्षेकरिता/मुलाखतीकरिता केलेल्या प्रवासाचा खर्च:-**

नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्याच्या बाबतीत, परीक्षेच्या/मुलाखतीच्या प्रयोजनाकरिता उमेदवारांना करावे लागणारे सर्व प्रवास हे, याबाबतीत काही विनिर्दिष्ट प्रवर्गाच्या उमेदवारांच्या संबंधात वेळोवेळी शासन/महानगरपालिकेकडून मंजूर करण्यात आलेल्या कोणत्याही सवलतीच्या अधीन राहून, स्वत:च्या खर्चाने असतील. याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना असेल.

**१६. नियुक्तीकरिता निवड झाल्यावर पदस्थापना:-**

नियुक्तीकरिता निवड झालेले उमेदवार हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत कोठेही किंवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर महानगरपालिकेचे कार्यालय जेथे असेल तेथे किंवा महानगरपालिका भविष्यकाळात कार्यालय सुरू करू शकेल, तेथे पदस्थापना केले जाण्यास पात्र ठरतील.

**१७. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबावतंत्राचा वापर:-**

कोणत्याही उमेदवाराच्या नियुक्तीसंदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न हा त्या उमेदवाराला त्या पदावरील नियुक्तीसाठी अनर्ह करणारा ठरेल.

**१८.** हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी विहित मार्गाने झालेल्या सरळसेवा नियुक्त्यांना शासनाने अन्यथा वेगळी लेखी कारणे नमूद करून निर्देश दिले नसतील तर या नियमातील तरतुदीमुळे बाधा येणार नाही.

**१९.** वेळोवेळी सेवाभरती/आरक्षण/वयोमर्यादा/परीविक्षाधीन कालावधी नियमित करणे, इत्यादींबाबत निर्देश देणारे राज्य शासनाने नियम, अधिनियम, निर्णय व न्यायनिर्णय यानुसार या नियमात सुधारणा (Amendment) करण्यात येईपर्यंत या शासन निर्णय/न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२०.** या नियमामधील कोणत्याही तरतुदीच्या अर्थविवरणाबाबत शंका उद्भवल्यास सदर बाब शासनाकडे निर्देशित करण्यात येईल व त्याबाबतीत शासनाचा निर्णय हा अंतिम राहील.

# वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना

(महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम-११ पहा.)

मी, याद्वारे प्रमाणित करतो/करते की, ______________________ महापालिकेच्या ( ) संवर्गातील ( ) या पदावर नेमणूक करण्यासाठी असलेल्या उमेदवारांची तपासणी केली आणि त्याला/तिला ________________ अतिरिक्त (सांसर्गिक किंवा अन्य) कोणताही रोग, शारीरिक दौर्बल्य किंवा शारीरिक अपंगत्व असल्याचे आढळले नाही ही गोष्ट ( ) कार्यालयात ( ) म्हणून नेमणुकीसाठी अनर्ह ठरविणार आहे असे मला वाटत नाही.

श्री./श्रीमती ______________________ यांच्या स्वत:च्या निवेदनावरून त्याचे/तिचे वय _____ वर्षे आहे आणि दिसण्यावरून तो/ती सुमारे ____ वर्षे वयाचा/वयाची आहे. त्याला/तिला लस टोचण्यात आली आहे.

**ओळख चिन्हे** ____________________

**डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा** ____________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव** ____________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी** ____________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम**
**(शिक्क्यासह)**

## परिशिष्ट-(१)

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० अंतर्गत सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती:-

### १. अधिकारी/कर्मचारी निवड समिती:-

महानगरपालिका पदांवर नियुक्तीकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५४ मध्ये विहित केल्यानुसार 'कर्मचारी निवड समिती' गठीत करण्यात येईल. सदर समिती गठीत करण्यात आलेल्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीकरिता अथवा भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरिता (यातील जो कालावधी कमी असेल, त्या कालावधीकरिता) वैध राहील.

याव्यतिरिक्त, नामनिर्देशनाने नियुक्ती करताना, मागासवर्गीय तसेच महिला उमेदवारांच्या हितरक्षणासाठी अशा समितीचे सदस्य म्हणून शासनाच्या प्रचलित आदेशानुसार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मुलाखतीच्या वेळेस विशेष निमंत्रित म्हणून बोलावले जाईल.

### २. नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| | |
|---|---|
| १) आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | -अध्यक्ष |
| २) मुख्य लेखा परीक्षक | - सदस्य |
| ३) संबंधित विभाग प्रमुख | - सदस्य |
| ४) आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी | - सदस्य |
| ५) जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | - सदस्य |
| ६) जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - सदस्य |
| ७) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - सदस्य |
| ८) उप आयुक्त (प्रशासन) | - सदस्य सचिव व निमंत्रक |

### ३. नामनिर्देशनाद्वारे नेमणुकीकरिता कार्यपद्धती:-

**(३.१)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरावयाची महानगरपालिकेमधील पदे निश्चित करून सदर पदे भरण्यासंदर्भात शासनाने निर्देश दिल्यानंतर संबंधित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**(३.२)** सद्य:स्थितीत महानगरपालिकेतील पदे भरण्यासंदर्भात पुढील कार्यपद्धती अनुसरण्यात यावी:-

(३.२.१) एखाद्या पदावरील नियुक्तीसाठी, ऑनलाईन/वृत्तपत्रातील जाहिरातीला अनुसरून किंवा महानगरपालिकेच्या सूचना फलकावरील सुचनेस अनुसरून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाचा किंवा सेवा विनियम केंद्राकडून वा शासनाच्या आदेशानुसार अन्य संस्था/कार्यालयाकडून आलेल्या यादीतील उमेदवाराच्या नावाचाच विचार करण्यात येईल.

(३.२.२) उमेदवाराने अर्जात दिलेल्या तपशीलाबाबत अधिक माहिती मागविण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

(३.२.३) जाहिरातीत/सेवा विनियम केंद्राकडे पाठविलेल्या मागणी पत्रात लेखी चाचणीचा उल्लेख असल्यास, अशा उमेदवारांना लेखी चाचणी द्यावी लागेल. परंतु, जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या आणि पात्र उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन अशी चाचणी न घेण्याचा निर्णय आयुक्तांना घेता येईल.

(३.२.४) चाचणी परीक्षेत किमान ५०% गुण मिळविण्याच्या मर्यादेच्या अधीन राहून रिक्त पदाच्या तिप्पट एवढ्या उमेदवारांना वरील (क) च्या निर्णयाप्रमाणे चाचणी परीक्षा न घेतल्यास, अशा सर्व निर्देशित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल व अशा उमेदवारांची यादी निवड समितीच्या प्रत्येक सदस्यास मुलाखतीच्या वेळी पुरविण्यात येईल. परंतु, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/सामाजिक व आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग/इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५०% ऐवजी ४५% गुण मिळविण्याची अट राहील.

(३.२.५) मुलाखतीत खालील बाबींवर विशेष लक्ष दिले जाईल:-

**(अ)** सामाजिक प्रश्नाबाबतची जाणीव.

**(ब)** पुर्वानुभव :- ज्या पदावर नेमणूक द्यावयाची त्या पदासाठी आवश्यक असा अनुभव.

**(क)** सेवा भरती नियमात विशेष अर्हता वा इतर कोणत्याही बाबतीत प्राधान्य नमूद असल्यास त्यासाठी द्यावयाचे गुण.

(३.२.६) निवड समिती यानंतर एकूण गुण लक्षात घेऊन गुणांच्या उतरत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करील व ती आयुक्तांकडे पाठविण्यासाठी लिफाफ्यात बंद करील.

४. <u>पदोन्नतीने नेमणुकीकरिता कार्यपद्धती</u>:-

(४.१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.५६६/का.१२, दि.०८ जानेवारी, २०१६ मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे दरवर्षी पदोन्नतीची प्रक्रिया विहित कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी वेळापत्रकाचे कोटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(४.२) प्रत्येक वर्षी १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट या कालावधीत प्रत्येक संवर्गात पदोन्नतीने किती पदे भरावी लागणार आहेत, याचा आढावा सामान्य प्रशासन विभागातर्फे जून महिन्यात आयुक्तांना सादर करतील.

(४.३) उपरोक्त शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करताना, पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या निश्चित झाल्यावर आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठतानुक्रमाने पदांच्या संख्येच्या तिप्पट (१:३) कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात (Zone of Consideration) समावेश करण्यात येईल.

(४.४) विभागीय चौकशी सुरू असलेल्या तसेच निलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याची नावे ज्येष्ठतानुक्रमाने यादीत येत असल्यास, त्यांची नावे यादीतून वगळण्यात येऊ नयेत. त्यांच्या नावाचा विचार केल्यावर निवड समितीचा अभिप्राय त्यांच्या नावासमोर नोंदविण्यात येईल.

(४.५) पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांचा निवडसूचीत ज्येष्ठतेनुसार समावेश करण्यात येईल.

(४.६) निवड समिती कर्मचाऱ्यांचे मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवाल आणि त्यांचेपुढे ठेवलेली इतर कागदपत्रे यांचे अवलोकन करून कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या योग्यतेबद्दल निर्णय घेईल. मात्र असा निर्णय एकमताने झाला नाही, तर त्याबद्दलचा अंतिम निर्णय समिती प्रमुखाचा असेल.

(४.७) कर्मचाऱ्यांच्या निवडीसंबंधी अंतिम निर्णय घेण्यापूर्वी अधिक माहितीची आवश्यकता वाटल्यास अशी माहिती मागविण्याचा समितीस अधिकार असेल.

५. वरील (३) व (४) नुसार निवड समितीने केलेली शिफारस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५३ (१), ५३ (२) वा ५३ (३) नुसार संबंधित सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी ठेवली जाईल.

६. तयार करण्यात आलेली निवडसूची त्या-त्या निवडसूचीच्या वर्षासाठी वैध असेल.

७. समिती सचिव बैठकीचा कार्यवृत्तांत तयार करून त्यास समितीची मान्यता घेण्यास जबाबदार असेल. सदस्यांना सादर केलेली सर्व कागदपत्रे परत घेऊन ती एकत्रित जतन करण्याची जबाबदारी समिती सचिवाची असेल.

८. गट-क आणि गट-ड मध्ये सेवा भरती करताना सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.न्याप्र-१००३/९९/प्र.क्र.२/०३(भाग-२)/१६अ, दिनांक २५ ऑक्टोबर, २००५ अन्वये एकत्रित मार्गदर्शक तत्वांचा लागू असेल तेथे अवलंब करण्यात यावा. या मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी होणारे बदलही अंमलात आणण्यात यावेत.

oooooooo

## परिशिष्ट - २

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२०

### अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | विभाग (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय विभाग | १५ |
| २ | स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनि:सारण, अनाधिकृत बांधकाम निर्मुलन, दक्षता व गुणनियंत्रण, नगररचना विभाग | २२ |
| ३ | नगररचना विभाग | २५ |
| ४ | यांत्रिकी विभाग | २६ |
| ५ | पर्यावरण अभियांत्रिकी विभाग | २८ |
| ६ | विद्युत विभाग | २९ |
| ७ | अणुविद्युत व दुरसंचार विभाग | ३१ |
| ८ | माहिती व तंत्रज्ञान विभाग | ३३ |
| ९ | लेखा विभाग | ३४ |
| १० | लेखा परीक्षण विभाग | ३६ |
| ११ | नगरसचिव विभाग | ३७ |
| १२ | माहिती व जनसंपर्क विभाग | ३७ |
| १३ | वाचनालय विभाग | ३८ |
| १४ | औद्योगिक प्रशिक्षण विभाग | ३९ |
| १५ | समाज विकास विभाग | ४१ |
| १६ | कामगार कल्याण विभाग | ४२ |
| १७ | कायदा विभाग | ४२ |
| १८ | वाहतूक विभाग | ४४ |
| १९ | सुरक्षा विभाग | ४५ |
| २० | भांडार विभाग | ४७ |
| २१ | उद्यान विभाग | ४८ |
| २२ | वैद्यकीय विभाग | ५२ |
| २३ | वैद्यकीय विभाग - (पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट) | ७२ |
| २४ | पशुवैद्यकीय विभाग | ९८ |
| २५ | प्राणिसंग्रहालय | ९९ |
| २६ | क्रीडा विभाग | ९९ |
| २७ | आरोग्य विभाग | १०१ |
| २८ | अग्निशमन विभाग | १०५ |
| २९ | सांख्यिकी विभाग | ११२ |


*******

## परिशिष्ट - (२)

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०२०

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम - ४५ व कलम - ५३ (१) मधील तरतुदींनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठीची कलम - ४५(३) व कलम - ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता**

**(पहा नियम-३)**

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | **(१) प्रशासकीय विभाग** |
| १ | प्रशासकीय सेवा श्रेणी - १ | आयुक्त (महानगरपालिका आयुक्त) | प्रतिनियुक्ती | १) राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल असा अधिकारी. (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३६ नुसार भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी) |
| २ | प्रशासकीय सेवा श्रेणी -१ | अतिरिक्त आयुक्त | पदोन्नती - १ पद | १) शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१४/प्र.क्र.२१८/नवि-१४, दि. ०६/०१/२०१५, दि.७/१/२०१५ व दि.२५/६/२०१५ नगर विकास विभागाच्या शासन निर्णयामध्ये निश्चित करण्यात आलेल्या अर्हतेनुसार (शासन वेळोवेळी सदर अर्हतेत बदल करेल असे बदल लागू राहतील.) |
| | | | प्रतिनियुक्ती- २ पदे | १) राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणुक करण्यात येईल असा शासनाचे सह सचिव, उप सचिव दर्जाचे/ मुख्य अधिकारी (निवडश्रेणी) किंवा समकक्ष वेतनश्रेणीतील अधिकारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे नियुक्त करता येईल. |
| ३ | प्रशासकीय सेवा श्रेणी -१ | सह आयुक्त | पदोन्नती -१०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर, सह आयुक्त पदाच्या कनिष्ठ पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| ४ | प्रशासकीय सेवा श्रेणी -१ | उप आयुक्त | पदोन्नती-५०% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक आयुक्त या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. २) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ अन्वये उमेदवाराच्या सहायक आयुक्त पदावरील नियुक्तीस शासनची मान्यता असणे आवश्यक. |
| | | | प्रतिनियुक्ती ५०% | १) राज्य शासन /स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पद ३ वर्षे धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याची शासनाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती . |
| ५ | प्रशासकीय सेवा श्रेणी -१ | सहाय्यक आयुक्त | पदोन्नती- ५०% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासन अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| | | | प्रतिनियुक्ती ५० % | १) राज्य शासन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पदावरील किमान ३ वर्षे धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याची शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्ती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| ६ | प्रशासकीय सेवा श्रेणी-२ | प्रशासन अधिकारी | नामनिर्देशन / सरळसेवा ५०% (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक. २) शासकीय निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील प्रशासकीय कामाचा ७ वर्षाचा अनुभव.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | | पदोन्नती ५०% | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यालयीन अधिक्षक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| ७ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | कार्यालय अधिक्षक | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मुख्य लिपिक संवर्गात ३ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या व विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| ८ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | मुख्य लिपिक | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लिपिक / लिपीक-टंकलेखक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती.<br>२) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O. स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| ९ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लिपिक / लिपीक-टंकलेखक | नामनिर्देशन/ सरळसेवा७५% | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) शासनाची मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. मराठी टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० श.प्र.मि. असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O. स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| | | | पदोन्नती २५% | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) शासनाकडील मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. मराठी टंकलेखनाचा वेग अनुक्रमे ३० आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० श.प्र.मि.<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O. स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>४) उपरोक्त अर्हता धारण करणा-या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट ड मधील किमान ३ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-यांच्या एकत्रीत सेवाजेष्ठतेचा विचार करुन पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| १० | प्रशासकीय सेवा श्रेणी-२ | लघुलेखक (उच्चस्तर) | नामनिर्देशन (५० %) (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) मराठी व इंग्रजी लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्र.मि. व मराठी टंकलेखनाचा वेग ३० श. प्र. मि. व इंग्रजी टंकलखनाची प्र. ४० श.प्र.मि. (तत्संबधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक)<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O. स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| | | | पदोन्नती ५०% | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील निम्नस्तर लघुलेखक (मराठी/इंग्रजी) या पदावरील किमान ३ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| ११ | प्रशासकीय सेवा गट - क | लघुलेखक (निम्नस्तर ) | नामनिर्देशन / सरळसेवा ७५% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) मराठी / इंग्रजी लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्र.मि. व मराठी टंकलेखन ३० श.प्र. मि. आणि इंग्रजी वेग ४० शब्द प्र. मि. (तत्संबधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक).<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O. स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | | पदोन्नती २५% (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास १०० % नामनिर्देशन) | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यातील उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या व लघुलेखनाचा अनुभव असणाऱ्या, किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| १२ | प्रशासकीय सेवा गट-क | मुख्य वाहनचालक | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वाहनचालक या पदावरील किमान ३ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| १३ | प्रशासकीय सेवा गट-क | वाहन चालक | नामनिर्देशन ७५ % | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी.) आवश्यक.<br>२) जड वाहने चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>३) जड वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४) मोटार व्हेईकल अधिनियम, १९३९ मधील तरतुदीस अनुसरुन शारिरीकदृष्टया सक्षम आवश्यक. |
| | | | पदोन्नती २५% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व जड वाहन चालविण्याचा परवाना असलेल्या गट ड संवर्गातील कर्मचा-यांमधुन एकत्रीत सेवा जेष्ठतेनुसार. |
| १४ | प्रशासकीय सेवा गट- ड | नाईक | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील शिपाई पदावरील किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| १५ | प्रशासकीय सेवा गट- ड | शिपाई | नामनिर्देशन / सरळसेवा १००% | १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षा उत्तीर्ण.<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| १६ | प्रशासकीय सेवा गट- ड | मजुर | नामनिर्देशन १००% | १) इयत्ता ७ वी उत्तीर्ण आवश्यक.<br>२) मजूराचे काम करण्यास शारिरीकदृष्टया सक्षम असणे आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| **(२) स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनि:सारण, अनाधिकृत बांधकाम निर्मुलन, दक्षता व गुणनियंत्रण** | | | | |
| १७ | तांत्रिक सेवा गट - अ | शहर अभियंता | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सह शहर अभियंता या पदावर किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापिठाची अभियांत्रिकी पदवी अगर तत्सम पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) राज्य शासनाच्या अधीक्षक अभियंता या पदावरील किमान ३ वर्षे सदर पदावर कामाचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्ती. |
| १८ | तांत्रिक सेवा गट - अ | सह शहर अभियंता | पदोन्नती १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (B.E. Civil) अगर तत्सम पदवी आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता / उप शहर अभियंता / कार्यकारी अभियंता (वाहतुक नियोजन) पदावरील कामकाजाचा सलग ३ वर्ष अनुभव आवश्यक. |
| १९ | तांत्रिक सेवा गट - अ | कार्यकारी अभियंता | पदोन्नती १००% (पदवी- ७५% पदवीका - २५ %) | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य) या पदावरील मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी असल्यास ३ वर्ष व पदविका असल्यास ५ वर्ष अशा अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २० | तांत्रिक सेवा गट- ब | उपअभियंता, (स्थापत्य) | पदोन्नती १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेचा पदवीधारक किंवा पदवीका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता संवर्गात पदवीधारक असल्यास ३ वर्ष व पदवीकाधारक असल्यास ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २१ | तांत्रिक सेवा गट-क | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन ८५% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी / पदविका आवश्यक.<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | | पदोन्नती १५% | १) नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यरत सर्व्हेअर व स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावरील कर्मचाऱ्यामधून पदवीधारक असल्यास ३ वर्षे व पदवीकाधारक असल्यास ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| २२ | तांत्रिक सेवा गट - क | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | नामनिर्देशन १००% | १) शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार. |
| २३ | तांत्रिक सेवा गट - अ | चिफ केमिस्ट | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील मायक्रो बायोलॉजी / केमिस्ट्री / इन्व्हायरमेंट सायन्स या विषयातील एम.एस्सी. ही पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक.<br>२) शासकिय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / नामांकित संस्थेतील केमिस्ट पदावरील ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील केमिस्ट या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २४ | तांत्रिक सेवा गट - ब | केमिस्ट | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील मायक्रो बायलॉजी / केमिस्ट्री / इन्व्हायरमेंट सायन्स या विषयातील (एम.एस्सी.) ही पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>२) शासकिय / निमशासकिय / स्थानिक स्वराज्य संस्था / नामांकित संस्थेतील असिस्टंट केमिस्ट किंवा समकक्ष पदावरील ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील असिस्टंट केमिस्ट या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| २५ | तांत्रिक सेवा गट - क | असिस्टंट केमिस्ट | नामनिर्देशन १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची रसायनशास्त्र (केमिस्ट्री) किंवा सुक्ष्मजीवशास्त्र (मायक्रोबायोलॉजी) किंवा पर्यावरण शास्त्र (एनव्हायर्नमेंट सायन्स) विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी.) आवश्यक.<br>२) या क्षेत्रातील नामांकित संस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २६ | तांत्रिक सेवा गट - क | गाळणी निरिक्षक (फिल्टर इन्स्पेक्टर) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी.) (केमिस्ट्री विषयासह) आवश्यक.<br>२) फिल्टर वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट चालविण्याच्या कामाचा ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गाळणी चालक (ऑपरेटर) या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| २७ | तांत्रिक सेवा गट - क | गाळणी चालक (ऑपरेटर) | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस्सी.) (केमिस्ट्री विषयासह) आवश्यक. |
| २८ | तांत्रिक सेवा गट - क | प्लंबर | नामनिर्देशन १००% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी.) आवश्यक.<br>२) शासन औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील अथवा शासनमान्य संस्थेतील प्लंबर हा कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) एन.सी.टी.व्ही.टी. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| | | (३) नगररचना विभाग | | |
| २९ | शहर विकास सेवा गट-अ | उप संचालक (नगररचना) | प्रतिनियुक्ती १००% | १) महाराष्ट्र शासन, नगररचना विभाग यांच्याकडील समकक्ष पदावरील अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती. |
| ३० | शहर विकास सेवा गट- अ | भूमी सपांदन अधिकारी | प्रतिनियुक्तीने १००% | १) शासन सेवेतील समकक्ष पदांवरील अधिका-यामधुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती. |
| ३१ | शहर विकास सेवा गट-ब | नगररचनाकार | पदोन्नती १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी बी.ई. प्लॅनिंग शाखेची पदवी किंवा बी.आर्च. आवश्यक.<br>२) उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक नगररचना किंवा कनिष्ठ अभियंता या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) महाराष्ट्र शासनाकडील नगर रचनाकार (नगर रचना) संवर्गातून प्रतिनियुक्तीने नियुक्ती. |
| ३२ | शहर विकास सेवा गट-क | सहायक नगररचनाकार | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी बी.ई. प्लॅनिंग शाखेची पदवी किंवा बी.आर्च. असणे आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| ३३ | तांत्रिक सेवा गट - क | सर्व्हेअर | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी किंवा पदविका किंवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (एच.एस.सी.) केल्यानंतर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील २ वर्षाचे सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण व एन.सी.टी.व्ही.टी. उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३४ | तांत्रिक सेवा गट - क | आरेखक | पदोन्नती १०० % | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अनुरेखक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| ३५ | तांत्रिक सेवा गट - क | अनुरेखक | नामनिर्देशन १००% | १) उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एच.एस.सी.) असणे आवश्यक.<br>२) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अनुरेखक व तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| | | **(४) यांत्रिकी विभाग** | | |
| ३६ | तांत्रिक सेवा गट - अ | कार्यकारी अभियंता, (यांत्रिकी) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील ऑटोमोबाईल / यांत्रिकी अभियांत्रिकी मधील पदवी आवश्यक.<br>२) शासकीय, निमशासकीय संस्थेमधील उप अभियंता (समकक्ष पद) ऑटोमोबाईल / यांत्रिकी पदावरील किंवा अन्यत्र तत्सम पदावर किमान ५ वर्षाची सेवा पूर्ण असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (ऑटोमोबाईल / यांत्रिकी) / कार्यव्यवस्थापक व मान्यता प्राप्त विद्यापिठाची मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेची पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्यास ३ वर्षे व पदवीका धारण करणारा ५ वर्ष अशा अधिकाऱ्यांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| ३७ | तांत्रिक सेवा गट - ब | कार्यव्यवस्थापक | पदोन्नती १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील ऑटोमोबाईल /यांत्रिकी अभियांत्रिकी मधील पदवी किंवा पदविका धारक आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल/ यांत्रिकी ) / सहा. कार्यव्यवस्थापक पदावरील पदवी धारक असलेस ३ वर्ष व पदवीकाधारक असलेस ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ३८ | तांत्रिक सेवा गट - क | सहाय्यक कार्यव्यवस्थापक / कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील ऑटोमोबाईल / यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेचा पदवी किंवा पदविकाधारक आवश्यक.<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३९ | तांत्रिक सेवा गट - क | फिटर | नामनिर्देशन ७५% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी.) आवश्यक.<br>२) शासन औद्योगिक प्रशिक्षण केंद्राकडील अथवा शासनमान्य संस्थेतील मोटार मेकॅनिक अथवा डिझेल मेकॅनिक हा कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) एन.सी.टी.व्ही.टी.परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती २५% | १) नामनिर्देशनासाठी असलेली अर्हता धारण करणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मेन्टेनन्स हेल्पर या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| ४० | तांत्रिक सेवा गट - ड | मेन्टेंनन्स हेल्पर | नामनिर्देशन १००% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.) असणे आवश्यक.<br>२) आय.टी.आय. मोटार मेकॅनिक/डिझेल मेकॅनिक कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | **(५) पर्यावरण अभियांत्रिकी विभाग** | |
| ४१ | तांत्रिक सेवा गट - अ | सह शहर अभियंता (पर्यावरण) | नामनिर्देशन<br>(पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पर्यावरण अभियांत्रिकी / पब्लिक हेल्थ मधील एम.ई. / एम.टेक / एम.एस.ही पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक.<br>२) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेतील पर्यावरण अधिकारी अथवा तत्सम पदावरील ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पर्यावरण अभियांत्रिकी शाखेतील पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या व कार्यकारी अभियंता (पर्यावरण) या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| | | | प्रतिनियुक्ती<br>(पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) महाराष्ट्र शासनाकडील समकक्ष दर्जाच्या अधिका-याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ४२ | तांत्रिक सेवा गट - अ | कार्यकारी अभियंता, (पर्यावरण) | नामनिर्देशन<br>(पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) पर्यावरण शाखेतील अभियांत्रिकी पदवी किंवा पर्यावरण अभियांत्रिकी शाखेतील पदव्युत्तर पदवी.<br>२) समकक्ष पदावरील कामकाजाचा ५ वर्षे अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील पर्यावरण अभियांत्रिकी शाखेतील पदव्युत्तर पदवी धारण करणा-या उपअभियंता (पर्यावरण) या पदावरील ३ वर्षांचा अनुभव असणाऱ्या सेवाज्येष्ठ व गुणवत्ता धारण करणाऱ्या अभियंत्यामधून. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| ४३ | तांत्रिक सेवा गट - ब | उपअभियंता (पर्यावरण) | पदोन्नती १००% | १) पर्यावरण अभियांत्रिकी शाखेतील पदवी/पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता संवर्गातील उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या व पर्यावरण किंवा जलनि:सारण किंवा घनकचरा व्यवस्थापन या विभागातील कामाचा अनुभव असलेल्या व सदर पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| | | **(६) विद्युत विभाग** | | |
| ४४ | तांत्रिक सेवा गट - अ | सह शहर अभियंता (विद्युत) | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता (विद्युत) या पदावरील किमान ०३ वर्षांचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| ४५ | तांत्रिक सेवा गट - अ | कार्यकारी अभियंता (विद्युत) | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (विद्युत) या पदावर मान्यताप्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी असल्यास ३ वर्ष व पदविकास असल्यास ५ वर्ष अशा अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ४६ | तांत्रिक सेवा गट - ब | उपअभियंता (विद्युत) | पदोन्नती १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेचा पदवीधारक किंवा पदवीका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (विद्युत) संवर्गात पदवीधारक असल्यास ३ वर्ष व पदवीकाधारक असल्यास ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| ४७ | तांत्रिक सेवा गट - क | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन ८५% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रीकी शाखेची पदवी/पदविका आवश्यक. |
| | | | पदोन्नती १५% | १) नामनिर्देशने विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या पिंपरी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विद्युत पर्यवेक्षक पदावरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| ४८ | तांत्रिक सेवा गट - क | विद्युत पर्यवेक्षक | नामनिर्देशनाने (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनाने ) | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.) असणे आवश्यक.<br>२) शासनमान्य संस्थेकडील विजतंत्री अभ्यासक्रम उत्तीर्ण व वीजतंत्री संवर्गातील कर्मचा-यांमधुन किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वीजतंत्री या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| ४९ | तांत्रिक सेवा गट - क | वीजतंत्री (इलेक्ट्रीशियन) | नामनिर्देशनाने (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास ) | १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी.) आवश्यक.<br>२) शासन मान्य औद्यागिक प्रशिक्षण संस्थेचे वीजतंत्री अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>३) एन.सी.टी.व्ही.टी. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नतीने १०० % | १) नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वायरमन /जनरेटर ऑपरेटर /इलेक्ट्रीक मोटार पंप ऑपरेटर/ऑपरेटर या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २१० | वैद्यकीय सेवा गट - अ | सहाय्यक प्राध्यापक उरोरोग शास्त्र (पलमोनोलॉजी) | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. (Tuberculosis) /एम.डी. (TB & Respiratory Dise.)/ एम.डी.(Medicine)with T.D.D., D.T.D. or D.T.C.D./एम.डी. (TB & Chest Diseases) / डी.एन.बी. (Respiratory Medicine) आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात ३ वर्षे कनिष्ठ निवासी आणि मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात संबंधित विषयात १ वर्षे वरीष्ठ निवासी डॉक्टर म्हणून अनुभव.<br>३) भारतीय वैद्यकीय परिषदेच्या (MCI) मार्फत वेळोवेळी निश्चित होणारी अर्हता लागू राहील. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २११ | वैद्यकीय सेवा गट - अ | सहाय्यक प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र | नामनिर्देशन १००% | १) एम.डी.(Bacteriology)/ एम.डी. (Microbiology)/एम.बी.बी.एस. with M.Sc.(Med. Bacteriology)/M.Sc. (Med. Microbiology)/पी.एच.डी.(Med. Bacteriology)/M.Sc. (Med. Bact.) With Ph.D. (Med. Bacteriology)/ M.Sc.(Med. Bacteriology) with D. Sc. (Med. Bacteriology)/ M.Sc.(Med. Microbiology) with D. Sc. (Med. Microbiology) /डी.एन.बी. (Microbiology) आवश्यक.<br>२) भारतीय वैद्यकीय परिषदेच्या (MCI) मार्फत वेळोवेळी निश्चित होणारी अर्हता लागू राहील. |
| २१२ | वैद्यकीय सेवा गट - अ | Antenatal Medical officer-cum-lecturer/Assistant Professor | नामनिर्देशन १००% | १) एम.डी. (Obst. & Gynae) /एम.एस. (Obst. & Gynae) /डी.एन.बी. (Obst. & Gynae) आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात ३ वर्षे कनिष्ठ निवासी आणि मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात संबंधित विषयात १ वर्षे वरीष्ठ निवासी डॉक्टर म्हणून अनुभव.<br>३) भारतीय वैद्यकीय परिषदेच्या (MCI) मार्फत वेळोवेळी निश्चित होणारी अर्हता लागू राहील. |
| २१३ | वैद्यकीय सेवा गट - अ | Maternity and Child Welface Officer-cum-lecturer/Assistant Professor | नामनिर्देशन १००% | १) एम.डी. (Obst. & Gynae) /एम.एस. (Obst. & Gynae) /डी.एन.बी. (Obst. & Gynae) आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात ३ वर्षे कनिष्ठ निवासी आणि मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयात संबंधित विषयात १ वर्षे वरीष्ठ निवासी डॉक्टर म्हणून अनुभव<br>३) भारतीय वैद्यकीय परिषदेच्या (MCI) मार्फत वेळोवेळी निश्चित होणारी अर्हता लागू राहील. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २१४ | वैद्यकीय सेवा गट - अ | Epidemiologist-cum-Assistant Professor | नामनिर्देशन १००% | १) एम.डी. (PSM) आवश्यक.<br>२) भारतीय वैद्यकीय परिषदेच्या (MCI) मार्फत वेळोवेळी निश्चित होणारी अर्हता लागू राहील. |
| २१५ | वैद्यकीय सेवा गट - अ | Statistician-cum-Assistant Professor | नामनिर्देशन १००% | १) एम.एस.सी. Statistics (PSM) आवश्यक.<br>२) मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता प्राप्त असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयामधील संबंधित विषयाच्या अध्यापनाचा ३ वर्षे अनुभव आवश्यक<br>३) भारतीय वैद्यकीय परिषदेच्या (MCI) मार्फत वेळोवेळी निश्चित होणारी अर्हता लागू राहील. |
| २१६ | वैद्यकीय सेवा गट- ब | आरोग्य शिक्षक Health Educator | नामनिर्देशन १००% | १) शास्त्र शाखेचा पदवीधर व एम.एस..डब्ल्यू ही पदवी आवश्यक. |
| २१७ | वैद्यकीय सेवा गट- ब | Occupational Therapist | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील शास्त्र शाखेची (Occupational Therapy) पदवी आवश्यक. |
| २१८ | निमवैद्यकीय सेवा गट — ब | Vocational Counsellor | नामनिर्देशन १००% | १) शास्त्र शाखेची पदवी व<br>२) एम.एस..डब्ल्यू ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| २१९ | निमवैद्यकीय सेवा गट — ब | Prosthetic and Orthotic technician | नामनिर्देशन १००% | १) prosthetic and Orthotic technicians या विषयातील ३ वर्षाची पदवीका आवश्यक. |

| अ. क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २२० | निमवैद्यकीय सेवा गट — क | Medico-rehabilitationworkers/(MRW)/Technician/Therapist | नामनिर्देशन १००% | १) शास्त्र शाखेची पदवी व एम.एस.डब्ल्यू. ही पदवी आवश्यक. |
| २२१ | निमवैद्यकीय सेवा गट- क | Documentalist | नामनिर्देशन १००% | १) शास्त्र शाखेची पदवी आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील लायब्ररी सायन्स मधील बी.लिब ही पदवी आवश्यक. |
| २२२ | निमवैद्यकीय सेवा गट- क | Cataloguer | नामनिर्देशन १००% | १) शास्त्र शाखेची पदवी आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.लिब ही पदवी आवश्यक. |
| २२३ | निमवैद्यकीय सेवा गट- क | Coding Clerk | नामनिर्देशन १००% | १) कोणत्याही शाखेची पदवी शास्त्र शाखेची पदवी आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.लिब ही पदवी आवश्यक. |
| २२४ | निमवैद्यकीय सेवा गट- क | Photographer | नामनिर्देशन १००% | १) कला शाखेचा पदवीधर (जी.डी.आर.) असणे आवश्यक.<br>२) कोरल ड्रॉ व फोटोशॉप कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| २२५ | निमवैद्यकीय सेवा गट- क | Artist Modeller | नामनिर्देशन १००% | १) कला शाखेचा पदवीधर (जी.डी.आर.) असणे आवश्यक.<br>२) कोरल ड्रॉ व फोटोशॉप कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| २२६ | निमवैद्यकीय सेवा गट- क | Techinician in Audio-Visual aids Photography and Artist | नामनिर्देशन १००% | १) कला शाखेचा पदवीधर (जी.डी.आर.) असणे आवश्यक.<br>२) कोरल ड्रॉ व फोटोशॉप कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **(२४) पशुवैद्यकीय विभाग** | |
| २२७ | पशुवैद्यकीय सेवा गट - अ | मुख्य पशुसंवर्धन अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उमेदवार उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनाने) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील (सर्जरी / मेडीसीन / गायनॅकॉलॉजी) या विषयातील एम.व्ही.एस.सी. ही पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शासकीय /निमशासकीय / खाजगी नामवंत संस्थेतील या विषयातील पशुवैद्यकीय अधिकारी अथवा तत्सम पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव अवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पशुवैद्यकीय अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील समकक्ष पदावरील योग्य त्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नेमणूक. |
| २२८ | पशुवैद्यकीय सेवा गट - ब | सहाय्यक अधिक्षक (झू)/पशुवैद्यकीय अधिकारी | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील (सर्जरी / मेडीसीन / गायनॅकॉलॉजी) या विषयातील एम.व्ही.एस.सी. ही पदव्युत्तर पदवी किंवा बी.व्ही.एस.सी. अँड ए.एच. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील सर्जरी / मेडीसीन / गायनॅकॉलॉजी लाईव्हस्टॉक प्रोडक्शन मॅनेजमेंट / लाईव्हस्टॉक प्रोडक्शन टेक्नॉलॉजी या विषयातील एम.व्ही.एस.सी. ही पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असल्यास प्राधान्य. |
| २२९ | पशुवैद्यकीय सेवा गट - क | लाईव्हस्टॉक सुपरवायझर/पशुधन पर्यवेक्षक | नामनिर्देशन १००% | १) शासनमान्य संस्थेकडील पशुवैद्यकीय शास्त्रातील किमान पदवीका उत्तीर्ण किंवा<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील लाईव्हस्टॉक सुपरवायझर कोर्स उतीर्ण असावा आणि लाईव्हस्टॉक सुपरवायझर पदाचा किमान १ वर्षाचा अनुभव असावा. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | **(२५) प्राणिसंग्रहालय** |
| २३० | पशुवैद्यकीय सेवा गट - क | ॲनिमल किपर | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पशुवैद्यकीय पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) प्राणी संग्रहालयाचे ठिकाणी किमान ५ वर्षे कामाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक ॲनिमल किपर या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| २३१ | पशुवैद्यकीय सेवा गट - ड | सहाय्यक ॲनिमल किपर | नामनिर्देशनाने १००% | १) उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( एच.एस.सी.) असणे आवश्यक<br>२) प्राणी संग्रहालयाचे ठिकाणी किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | | **(२६) क्रीडा विभाग** |
| २३२ | क्रीडा सेवा गट - ब | क्रीडा अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बी.पी.एड. पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) स्पोटर्स ऑथोरिटी ऑफ इंडिया कडील पदविका असणे आवश्यक.<br>३) राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूस प्राधान्य देण्यात येईल.<br>४) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा राष्ट्रीय क्रीडा संस्थेतील तत्सम पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील क्रीडा पर्यवेक्षक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २३३ | क्रीडा सेवा गट - क | क्रीडा पर्यवेक्षक | नामनिर्देशन २५% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.पी.एड. पदवी असणे आवश्यक.<br>३) क्रीडा शिक्षक/प्रशिक्षक पदाचा ५ वर्षे अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती ७५% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.पी.एड. पदवी असणे आवश्यक.<br>३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील क्रीडा विभागातील क्रीडा शिक्षक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| २३४ | क्रीडा सेवा गट - क | क्रीडा शिक्षक | नामनिर्देशन १००% | १) शासनाचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार. |
| २३५ | क्रीडा सेवा गट - ड | जीवरक्षक कम मदतनीस | नामनिर्देशन १००% | १) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी.) असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र शासनाने अथवा शासन मान्यताप्राप्त संघटनानी आयोजित केलेल्या जिल्हा पातळीवरील पोहण्याच्या स्पर्धामध्ये पदक प्राप्त असणे आवश्यक.<br>३) प्रात्यक्षिक चाचणीत उत्तीर्ण होणे आवश्यक |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | **(२७) आरोग्य विभाग** |
| २३६ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - अ | आरोग्य कार्यकारी अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील (M.D.), (P.S.M.)/M.D.) पदव्युत्तर पदवी किंवा डी.पी.एच.<br>२) शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सहाय्यक आरोग्याधिकारी / उप मुख्य स्वच्छता अधिकारी/समकक्ष गट-ब या संवर्गातील किमान ०५ वर्षाचा अनुभव.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | | पदोन्नतीने १००% | १) महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत सहाय्यक आरोग्य अधिकारी या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| २३७ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - ब | सहाय्यक आरोग्य अधिकारी | नामनिर्देशन २५% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक.<br>२) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३) शासकीय निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील आरोग्य विभागातील पर्यवेक्षकीय कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. (गट क पेक्षा कमी नसलेल्या पदावरील) |
| | | | पदोन्नती ७५% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मुख्य आरोग्य निरीक्षक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| २३८ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - क | मुख्य आरोग्य निरिक्षक | पदोन्नतीने १००% | १) मान्यताप्राप्त विदयापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणेआवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य निरीक्षक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २३९ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - क | आरोग्य निरीक्षक | नामनिर्देशन ७५% | १) मान्यताप्राप्त विदयापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक.<br>२) शासनमान्य संस्थेकडील स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक |
| | | | पदोन्नती २५ % (पैकी ८०% पदे आरोग्य सहाय्यक तर २०% पदे एम.पी.डब्ल्यू कर्मचा-यां मधुन) | १) मान्यताप्राप्त विदयापीठाची कोणत्याही शाखेच्या पदवीधारकास प्राधान्य.<br>२) शासनमान्य संस्थेकडील स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य सहाय्यक / एम. पी. डब्ल्यू. या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती.<br>४) एम.पी.डब्लू. पात्रताधारक कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सदर पदे आरोग्य सहाय्यक संवर्गातून भरण्यात यावी.<br>५) एमपी डब्ल्यु व आरोग्य सहाय्यक संवर्गात पदोन्नतीची पात्रता धारक कर्मचारी उपलब्ध न झाल्यास अशी पदे आवश्यकतेनुसार नामनिर्देशनाने भरण्यात यावीत. |
| २४० | सार्वजनिक आरोग्य सेवा गट — क | आरोग्य सहाय्यक | पदोन्नती १००% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी.) असणे आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मुकादम / सफाई संवर्ग या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २४१ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - क | किटक शास्त्रज्ञ | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील ॲन्टोमॉलॉजी विषयासह शास्त्र शाखेचा पदव्युत्तर पदवीधर आवश्यक.<br>२) आरोग्य सेवेचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील ॲन्टोमॉलॉजी विषयासह शास्त्र शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मलेरिया इन्स्पेक्टर या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| २४२ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - क | मलेरिया इन्स्पेक्टर | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील ॲन्टोमॉलॉजी विषयासह शास्त्र शाखेचा पदवीधर आवश्यक. |
| २४३ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - ड | मुकादम | पदोन्नतीने १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील एस.एस.सी. उत्तीर्ण असणाऱ्या वर्ग ४ मधील सफाई संवर्गातील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| २४४ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - ड | सफाई कामगार | नामनिर्देशन १००% | १) इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शारिरीक कष्टाचे काम करण्यास सक्षम असणे आवश्यक. |
| २४५ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - ड | सफाई सेवक | नामनिर्देशन १००% | १) इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शारिरीक कष्टाचे काम करण्यास सक्षम असणे आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २४६ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - ड | गटरकुली | नामनिर्देशन १००% | १) इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शारिरीक कष्टाचे काम करण्यास सक्षम असणे आवश्यक. |
| २४७ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - ड | कचराकुली | नामनिर्देशन १००% | १) इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शारिरीक कष्टाचे काम करण्यास सक्षम असणे आवश्यक. |
| २४८ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट - ड | स्प्रे कुली | नामनिर्देशन १००% | १) इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शारिरीक कष्टाचे काम करण्यास सक्षम असणे आवश्यक. |
| २४९ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट — ड | किटक संघटक | नामनिर्देशन १००% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी.) असणे आवश्यक.<br>२) शारिरिक कष्टाची कामे करण्यासाठी आवश्यक शारिरिक पात्रता असणे आवश्यक. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | | **(२८) अग्निशमन विभाग** |
| २५० | अग्निशमन सेवा गट - अ | मुख्य अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन/<br>(पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर आवश्यक.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर यांचेकडील पदवी (बी.ई.फायर) धारण केलेली किंवा राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर यांचा डिव्हीजनल फायर ऑफिसर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) किंवा दि इन्स्टीटयुशन ऑफ फायर इंजिनिअर्स (युनायटेड किंगडम) या संस्थेकडील सदस्यत्व (एम.आय.फायर) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर दि इन्स्टीटयुशन ऑफ फायर इंजिनिअर्स (युनायटेड किंगडम) चे सदस्यत्व असावे.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>४) वय — ५५ वर्षापेक्षा अधिक नसावे.<br>शारिरीक पात्रता :- उंची - १६५ से.मी. (महिलांसाठी उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>छाती साधारण ८१ सें.मी. फुगवुन ०५ सें.मी. जास्त, वजन ५० कि.ग्रॅ., दृष्टी - चांगली.<br>४) अनुभव - कोणत्याही महानगरपालिका किंवा १५ ते २० अग्निशमन केंद्रे असलेल्या महानगरपालिका किंवा विशेष नियोजन प्राधिकरणामध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी (वर्ग-१) या पदावर **३ वर्षे** सेवा केलेला तसेच वरील शैक्षणिक व शारीरीकदृष्ट्य सक्षम असावा.<br>५) किंवा विभागीय अग्निशमन अधिकारी (वर्ग-२) या पदावर किमान **५ वर्षे** सेवा पुर्ण, तसेच वरील शैक्षणिक पात्रता पुर्ण करणारा उमेदवार असावा.<br>६) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्यांमधून सेवा जेष्ठता व पात्रतेच्या अधीन राहून पदोन्नतीने नियुक्ती.<br>२) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास सदर अधिकारी उपलब्ध होईपर्यंत, राज्य/केंद्र/ शासन/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवेतील समकक्ष पद किमान ५ वर्षापासून धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्त करता येईल. |
| २५१ | अग्निशमन सेवा गट - ब | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नती उपलब्ध न झाल्यास ) | १) मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाकरीता विहीत करण्यात आलेली शैक्षणिक व शारीरिक पात्रतेची अर्हता आवश्यक.<br>२) अनुभव - उपमुख्य अग्निशमन अधिकारी किंवा तत्सम पदावरील किमान ५ वर्ष सलग सेवा झालेली असावी<br>३) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| | | | पदोन्नती १००% | १) नामनिर्देशनाकरीता विहीत केलेली अर्हता धारण करणारा व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्यांमधून सेवा जेष्ठता व पात्रतेच्या अधीन राहून पदोन्नतीने नियुक्ती.<br>२) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २५२ | अग्निशमन सेवा गट - ब | विभागीय अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नती उपलब्ध न झाल्यास ) | १) मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाकरीता विहीत करण्यात आलेली शैक्षणिक व शारीरिक पात्रतेची अर्हता आवश्यक.<br>२) अनुभव - विभागीय अग्निशमन अधिकारी किंवा तत्सम पदावरील किमान ५ वर्ष सलग सेवा झालेली असावी.<br>३) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| | | | पदोन्नती (१००%) | १)नामनिर्देशनाकरीता विहीत केलेली अर्हता धारण करणारा व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्यांमधून सेवा जेष्ठता व पात्रतेच्या अधीन राहून पदोन्नतीने नियुक्ती.<br>२) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| २५३ | अग्निशमन सेवा गट - क | सहा विभागीय अग्निशमन अधिकारी (असिस्टंट डिव्हीजनल फायर ऑफिसर ) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाकरीता विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापेनवरील अग्निशमन सेवेतील अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| | | | पदोन्नती १००% | अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाकरीता विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापेनवरील अग्निशमन सेवेतील अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २५४ | अग्निशमन सेवा गट - क | अग्निशमन केंद्र अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर आवश्यक.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर यांचा स्टेशन ऑफिसर अँड इन्स्ट्रक्टर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केलेली असावी.<br>किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पुर्ण केलेला असावा. किंवा दि इन्स्टीटयुशन ऑफ फायर इंजिनिअर्स ( युनायटेड किंगडम ) किंवा इंडीया या संस्थेकडुन ग्रेड आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक.<br>४) उमेदवाराला शासकीय / निमशासकीय संस्थामधील अग्निशमन सेवेतील उप अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षाचा कामाचा अनुभव असावा.<br>उंची - १६५ से.मी., छाती साधारण ८१ से.मी फुगवुन ०५ से.मी जास्त वजन ५० कि.ग्रॅ., दृष्टी- चांगली<br>५) उमेदवाराचे वय ४० पेक्षा जास्त नसावे.<br>६) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| | | | पदोन्नती १००% | १) नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापेनवरील अग्निशमन सेवेतील उप अग्निशमन अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती.<br>२) जर राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर यांचा स्टेशन ऑफिसर अँड इन्स्ट्रक्टर कोर्स पुर्ण केलेला नसेल तर पदोन्नती झाल्यापासुन ३ वर्षात पुर्ण करणे आवश्यक.<br>३) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २५५ | अग्निशमन सेवा गट - क | उप अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन ५०% | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर आवश्यक.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर यांचा उप अग्निशमन अधिकारी हा पाठयक्रम पुर्ण केलला असावा. किंवा महराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी , महराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पुर्ण केलेला असावा.<br>किंवा दि इन्स्टीटयुशन ऑफ फायर इंजिनिअर्स ( युनायटेड किंगडम ) किंवा इंडीया या संस्थेकडुन ग्रेड आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) उमेदवाराला शासकीय / निमशासकीय संस्थामधील अग्निशमन सेवेतील प्रमुख अग्निशमन विमोचक किंवा चालक तथा यंत्र चालक या पदावर किमान ३ वर्ष अनुभव असावा.<br>४) शारिरीक पात्रता - उंची - १६५ से.मी. छाती साधारण ८१ से.मी फुगवुन ०५से.मी जास्त वजन ५० कि.ग्रॅ., दृष्टी - चांगली<br>५) उमेदवाराचे वय ३० वर्षेपेक्षा जास्त नसावे.<br>६) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| | | | पदोन्नती ५०% (प्रमुख अग्निशमन विमोचक ७५ % व चालक यंत्र २५%) | १) नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणारा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रमुख अग्निशमन विमोचक किंवा चालक तथा यंत्र चालक या पदावर नियमित ३ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्यांतून सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या अधिन राहून पदोन्नतीने नियुक्ती.<br>२) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २५६ | अग्निशमन सेवा गट - क | प्रमुख अग्निशमन विमोचक | नामनिर्देशन २५% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक .<br>२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असावा.<br>३) शारिरीक पात्रता<br>उंची - १६५ से.मी.,<br>छाती साधारण ८१ से.मी फुगवुन ०५से.मी जास्त, वजन ५० कि.ग्रॅ , दृष्टी - चांगली<br>४) उमेदवाराचे वय ३० पेक्षा जास्त असू नये.<br>५) शासकीय / निमशासकीय संस्थामधील अग्निशमन सेवेतील प्रमुख अग्निशमन विमोचक किंवा चालक यंत्र या पदावर किमान ५ वर्ष अनुभव असावा.<br>६) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| | | | पदोन्नती ७५% | १) नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणारा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विमोचक या पदावर नियमित ३ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्यांतून सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या अधिन राहून पदोन्नतीने नियुक्ती.<br>२) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |

| अ. क्र.<br>(१) | संवर्ग<br>(२) | पदनाम<br>(३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| २५७ | अग्निशमन सेवा गट - क | चालक तथा यंत्र चालक | नामनिर्देशन २५% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक .<br>२) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण.<br>३) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना .<br>४) जड वाहन चालक म्हणून किमान ३ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक.<br>५) शारीरिक पात्रता -<br>उंची - १६५ से.मी., छाती साधारण ८१ से.मी फुगवुन ०५से.मी जास्त<br>वजन ५० कि.ग्रॅ., दृष्टी चांगली<br>६) वयोमर्यादा — उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक असू नये. |
| | | | पदोन्नतीने ७५%<br>(अग्निशमन विमोचक ५० %) व वाहन चालक (अग्निशमन) २५ %) | १) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विमोचक किंवा वाहन चालक (अग्निशमन) या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | पदनाम (३) | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (४) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती पहा नियम (३) (५) |
|---|---|---|---|---|
| २५८ | अग्निशमन सेवा गट -ड | अग्निशमन विमोचक / फायरमन रेस्क्युअर | नामनिर्देशन १००% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक .<br>२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र , महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असावा.<br>३) एम.एस्सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक.<br>५) शारिरीक पात्रता- उंची - १६५ से.मी.<br>छाती साधारण ८१ से.मी फुगवुन ०५से.मी जास्त<br>वजन ५० कि.ग्रॅ. , दृष्टी - चांगली.<br>६) उमेदवाराचे वय ३० वर्षे पेक्षा जास्त नसावे.<br>७) किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| | | **(२९) सांख्यिकी विभाग** | | |
| २५९ | प्रशासकिय सेवा गट - क | सांख्यिकी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील सांख्यिकी विषयातील पदवी ( बी.एस.सी. स्टॅटीस्टीक्स / बी.एस.सी. ॲप्लाईड / स्टॅटीस्टीक्स कम्प्लीटेड / स्टॅटीस्टीक्स) आवश्यक. |
| | | | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सांख्यिकी सहाय्यक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |
| २६० | प्रशासकिय सेवा गट - क | सांख्यिकी सहाय्यक | नामनिर्देशन १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील सांख्यिकी विषयातील पदवी ( बी.एस.सी स्टॅटीस्टीक्स / बी.एस.सी. अप्लाईड/ स्टॅटीस्टीक्स कम्प्लीटेड / स्टॅटीस्टीक्स) आवश्यक. |

*****

## परिशिष्ट-(३)

## <u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम, २०२०</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक-५९) च्या कलम-४६५, पोटकलम-(१) खंड (ल) च्या तरतुदींनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी केलेले नियम.

### <u>नियम</u>

**१. <u>संक्षिप्त शीर्षक व नियम लागू होण्याचा दिनांक</u>:-**

**(अ)** या नियमास "पिंपरी चिंचवड महानगरपालिका (अर्हताकारी विभागीय परीक्षा) नियम, २०२०" असे संबोधण्यात येईल.

**(ब)** **शासन राजपत्रात** प्रसिद्ध होतील, त्या तारखेपासून हे नियम अंमलात येतील.

**२. <u>व्याख्या</u>:**-विषयांत किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमानुसार,-

**(२.१)** "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.

**(२.२)** "महानगरपालिका" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्माण केलेली "पिंपरी चिंचवड महानगरपालिका."

**(२.३)** "आयुक्त" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-३६ अन्वये शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.

**(२.४)** "कर्मचारी" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण-४, कलम-५१ (४) अन्वये नेमणूक केलेले अधिकारी/कर्मचारी. परंतु, यात रोजंदारीवर, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कंत्राटी पद्धतीने तसेच, अंशकालीन व मानद स्वरुपी नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

**(२.५)** "परिशिष्ट" म्हणजे, या नियमांना जोडलेले परिशिष्ट.

**(२.६)** "विभागीय परीक्षा" म्हणजे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेली व या नियमांच्या परिशिष्ट- (३) (अ) मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

ज्या शब्दांची वा शब्दसमुहांची व्याख्या या नियमांत समाविष्ट करण्यात आली नसेल, त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरले असतील तसा समजण्यात येईल.

३. **विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य**:-

(३.१) हे नियम अस्तित्वात आल्याच्या तारखेस पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी/अस्थायी स्वरुपात कोणत्याही पदावर नियुक्त असलेल्या व त्या तारखेनंतर नियुक्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना परिशिष्ट-(३) च्या (ब) व (क) मध्ये विहित केलेली आवश्यक ती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

(३.२) उपरोक्त परिशिष्ट-(३) (अ) मध्ये ज्या संवर्गाचा उल्लेख आलेला नसेल, त्या संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानाची लेखी व तोंडी परीक्षा आयुक्तांच्या मान्यतेने घेतली जाईल. याकरिता किमान तीस दिवसांपेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीची पुर्वसूचना संबंधितांस देण्यात येईल.

४. **कालावधी आणि संधीची संख्या**:-

(४.१) **राजपत्राच्या** दिनांकापूर्वी नियुक्त केलेल्या व्यक्तींकरिता कालावधी व संधीची संख्या या नियमांच्या अधीन राहून, **राजपत्राच्या** दिनांकापूर्वी महानगरपालिका कर्मचारी म्हणून नियुक्त झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या व्यक्तीने, तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम-१० अन्वये सूट दिलेली नसेल, तर **राजपत्राच्या** दिनांकापासून ३ वर्षांच्या आत व २ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(४.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

५. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक**:-

(५.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेच्या एकूण गुणांच्या किमान ४५% गुण मिळवणे आवश्यक असेल.

(५.२) प्रत्येक संवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या सर्व विषयांत वरील तरतुदीच्या आधारे एक वा एकापेक्षा अधिक संधीत उत्तीर्ण झाल्यावरच विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समजण्यात येईल.

६. **परीक्षेचे वेळापत्रक** :-

विभागीय परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या सक्षम प्राधिकारी यांनी विहित केलेल्या अभिकरणाकडून सर्वसाधारणपणे दरवर्षी प्रशासनाच्या/अभिकरणाच्या सोयीनुसार अशा परीक्षा मे ते जून महिन्यात घेतल्या जातील.

७. **परीक्षेचा अभ्यासक्रम**:-

विभागीय परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम **परिशिष्ट- (३) (ब)** मध्ये विहित केल्याप्रमाणे किंवा शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असेल.

परंतु, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण संस्था, नाशिक यांच्याकडून अभियांत्रिकी विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेल्या परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम त्या परीक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून जाहीर केल्याप्रमाणे असेल.

८. **प्रशिक्षण**:-

विभागीय परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परीक्षेपूर्वी किमान ४० तासांचा प्रशिक्षण कार्यक्रम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून आयोजित करण्यात येईल.

९. **परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम**:-

एखादा कर्मचारी नियम-४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत आणि संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर पुढील परिणाम होतील:-

(९.१) तो परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा नियम-१० अन्वये परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यास सूट मिळेपर्यंत, त्याला त्याच्या पदावर कायम करण्यात येणार नाही, किंवा त्याच्या पदाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही. अशा रितीने रोखून ठेवलेली वेतनवाढ तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम-१० अन्वये सूट देण्यात आल्याच्या दिनांकापासून त्याला देय असेल आणि कोणतीही वेतनवाढ रोखून न धरल्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देण्यात येतील. मात्र गतकाळातील थकबाकीची रक्कम अनुज्ञेय नसेल.

(९.२) त्याला त्या संवर्गातील आपली ज्येष्ठता गमवावी लागेल म्हणजेच जे कर्मचारी त्याच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नंतर त्याचा ज्येष्ठता क्रम लागेल. तसेच, अशा ज्या कर्मचाऱ्यांच्या नंतर त्याचा ज्येष्ठता क्रम लागेल, त्या कर्मचाऱ्यास ज्येष्ठ असणाऱ्या आणि त्याच्यानंतर, परंतु नियम-४ मध्ये विर्निदिष्ट केलेल्या कालावधीत व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नंतरचा ज्येष्ठता क्रम त्याला देण्यात येईल.

१०. **परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट**:-

(१०.१) **राजपत्राच्या** दिनांकानंतर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून पुढील बाबतीत सूट देण्यात येईल:-

**(अ)** त्यास यापूर्वीच कर्मचारी म्हणून कायम करण्यात आले असेल किंवा

**(ब)** तो सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण झाला असेल

(१०.२) कोणत्याही दिनांकास कर्मचारी ४५ वर्षे वयाचा झाल्यानंतर त्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

११. परीक्षा सर्वसाधारणपणे वर्षातून एकदा घेण्यात येईल. एखाद्या वर्षी जर कोणत्याही कारणास्तव परीक्षा घेण्यात आली नाही, तर कालावधी व संधीची गणना करताना कालावधी वगळण्यात येईल.

१२. **निर्वचनाच्या शक्ती**:-

नियमातील तरतुदींनुसार अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या एखाद्या संवर्गास कोणती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे वा कोणत्या संवर्गास ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आहे, यासंबंधी कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास त्याबाबतचा आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

०००००००

## परिशिष्ट-(३) (अ)
(नियम-३)

## विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग

| अ.क्र. | विभाग | संवर्ग |
|---|---|---|
| १. | प्रशासकीय | अतिरिक्त आयुक्त/उपआयुक्त/सहायक आयुक्त/सचिव/उपसचिव/कर निर्धारक व संकलक/ उप कर निर्धारक व संकलक/प्रशासकीय अधिकारी/ कार्यालय अधिक्षक/ वरिष्ठ लिपिक/लिपिक-टंकलेखक इत्यादी. |
| २. | लेखा/लेखा परीक्षण | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा अधिकारी (वर्ग-२)/ लेखापाल/वरिष्ठ लिपिक (लेखा)/लेखा लिपिक. |

## महापालिकेव्यतिरिक्त इतर प्राधिकाऱ्याकडून घेतल्या जाणाऱ्या विहित विभागीय परीक्षा

| अ.क्र. | विभाग | परीक्षा घेणारा प्राधिकारी | संवर्ग |
|---|---|---|---|
| १. | अभियांत्रिकी स्थापत्य/ विद्युत यांत्रिकी | अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/उप अभियंता. |
| २. | अग्निशमन | अग्निशमन महाविद्यालय, नागपूर | अग्निशमन विभागातील पदे. |

०००००००

## परिशिष्ट-(३) (ब)

## विभागीय परीक्षा

**प्रश्नपत्रिका-१** **(गुण- १००, वेळ-३ तास)**

१. सारांश लेखन.
२. टिप्पणी लेखन.
३. पत्र लेखन.
४. भाषांतर (इंग्रजीतून मराठीत).

---

**प्रश्नपत्रिका-२** **(पुस्तकांसह)** **(गुण- १००, वेळ- ३ तास)**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम
२. किमान वेतन अधिनियम
३. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
४. वस्तु व सेवा कर

---

**प्रश्नपत्रिका-३** **(पुस्तकांसह)** **(गुण- १००, वेळ- ३ तास)**

१) सेवेच्या सर्व साधारण शर्ती :-
(सर्व महाराष्ट्र नागरी सेवा नियम)
रजा
वेतन
वर्तणूक आणि शिस्त व अपील
निवृत्तीवेतन नियम
२) रचना व कार्यपध्दती- सहा गठ्ठे पध्दती
३) कार्यालयीन नियमपुस्तिका, जमाखर्च लेखा परीक्षा
४) प्राथमिक हिशोब तपासणी

---

**टीप:** या प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल व प्रश्नांची उत्तरे मराठी भाषेत द्यावी लागतील.

०००००००

## लेखा विभाग/लेखा परीक्षण विभागातील वरिष्ठ लिपिक (लेखा)/लेखा लिपिक/ लिपिक (लेखा परीक्षण) यांना प्रश्नपत्रिका १, २, ३ व्यतिरिक्त पुढे विहित करण्यात आलेल्या विषयांच्या परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागेल

**प्रश्नपत्रिका-४** (पुस्तकांसह) (गुण- १००, वेळ- ३ तास)

१. मुंबई वित्तीय नियम, १९५९.
२. महाराष्ट्र अर्थ संकल्प नियम पुस्तिका प्रकरण क्र. ४,५,७,९ व १७ तसेच परिशिष्टे २, ४, ८, ९, ११ वगळून.
३. महाराष्ट्र सार्वजनिक खर्च नियमावली, १९६५ तसेच नियमावली, १९९२.
४. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील २,३,६,७,८,९,१०,११,१२-१ ते १२-५ प्रकरणे.
५. महानगरपालिकेच्या निविदेसाठीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती.

---

**प्रश्नपत्रिका-५** (पुस्तकांसह) (गुण- १००, वेळ- ३ तास)

१. Book Keeping & Accountancy.
२. Accrual Based Double Entry Accounting
३. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७
४. मुंबई प्राथमिक शिक्षण नियम, १९४९

---

## गट - क च्या कर्मचाऱ्यांना गट- ब च्या पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वी या परिशिष्टातील प्रश्नपत्रिका क्र. १, २ व ३ व्यतिरिक्त खालील प्रश्नपत्रिकेत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल

**प्रश्नपत्रिका-६** (पुस्तकांसह) (गुण- १००, वेळ- ३ तास)

१. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.
२. महानगरपालिका (घनकचरा व्यवस्थापन) उपविधी, २००२.
३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्षांचे जतन अधिनियम, १९७५.
४. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान.
५. झोपडपट्टी सुधार समिती.
६. अंध व अपंगासाठीच्या शासनाच्या सवलती व योजना.
७. समाज विकास व बाल कल्याण संबंधीच्या शासनाच्या व महानगरपालिकेच्या योजना.

०००००००

## परिशिष्ट-(३) (क)

# विभागीय परीक्षा (अग्निशमन)

### विभाग-अग्निशमन

### संवर्ग-अग्निशामक/ड्रायव्हर ऑपरेटर

**तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा.:-** **(गुण- १००)**

| | | |
|---|---|---|
| १) | रासायनिक अग्निशामके | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| २) | शिड्या | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ३) | होज पाईप | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ४) | फोम व होम साधने | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ५) | हायड्रंट व होज फिटींग्ज | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ६) | पंप | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ७) | वॉटर रिले | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ८) | गाठी | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ९) | श्वसन उपकरणे | - साहित्याची नांवे व वापर |
| १०) | कवायत | - आज्ञापालन व सहकाऱ्याबरोबर कवायत करण्याची क्षमता |

**लेखी परीक्षा.:-** **(गुण- १००, वेळ- २ तास)**

**१)** प्रथमोपचार - प्रथमोपचार पेटीतील साहित्य व भाजणे, अस्थिभंग, धुसमटणे, रक्तस्त्राव, जखमा यांचेवर करावयाच्या प्रथमोपचाराची माहिती देणे.

**२)** वॉचरूम कार्यपद्धती - वॉचरुममध्ये ठेवल्या जाणाऱ्या रेकॉर्डची माहिती, त्यासाठी वापरली जाणारी कार्यपद्धती नमुने व काल्पनिक संदेशावर वॉचरुमच्या रेकॉर्डमध्ये नोंद करणे.

**३)** अग्निशामक व ड्रायव्हर- पदाच्या कर्तव्यांची माहिती असणे व ती कर्तव्य पार पाडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाबद्दलचा तपशील ड्रायव्हर ऑपरेटर पदाची कर्तव्ये.

**४)** शिस्त व कर्तव्यपालन - शिस्तीचे व कर्तव्यपालनाचे अग्निशमन विभागातील महत्व व त्यांचे पालन न झाल्यास होणारे परिणाम. कर्तव्यपालन न झाल्यामुळे वा झाल्यामुळे आठवणीत राहिलेल्या एखाद्या प्रसंगाचे वर्णन.

०००००००

परिशिष्ट-(४)

## नामनिर्देशन/सरळसेवा भरती करताना अग्निशमन विभागासाठी निकष व गुणांकन पद्धती

**१. शैक्षणिक अर्हता व अनुभव:-**

(१.१) अग्निशमन पदांसाठी शैक्षणिक अर्हता व अनुभव हा सदर नियमांच्या परिशिष्ट- (२) मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**(१.२) शारीरिक पात्रता:-**

| पुरुष | महिला |
|---|---|
| • उंची - किमान १६५ सें.मी. (अनवाणी)<br>• छाती - न फुगविता ८१ सें.मी.<br>- फुगवून ८६ सें.मी. (किमान ५ सें.मी. फुगवणे आवश्यक.)<br>• वजन- ५० कि.ग्रॅ.<br>• दृष्टी- सामान्य. वर्णांधता आजारापासून मुक्त असावा.<br>• उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ असावा. | • उंची - किमान १६२ सें.मी. (अनवाणी)<br>• वजन - ५० कि.ग्रॅ.<br>• छाती - महिला उमेदवारांसाठी लागू नाही.<br>• दृष्टी - सामान्य. वर्णांधता आजारापासून मुक्त असावा.<br>• उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ असावा. |

**२. परीक्षेचे टप्पे:-**

प्रस्तुत परीक्षा एकूण दोन टप्प्यात घेण्यात येईल:-

(१) लेखी परीक्षा-१०० गुण. (२) शारीरिक चाचणी-१०० गुण.

**(२.१) लेखी परीक्षा:-**

(१) लेखी परीक्षा (तांत्रिक/सामान्यज्ञान) १०० गुणांची असेल.

(२) लेखी परीक्षेसाठी उमेदवाराकडे सेवा भरती नियमात नमूद शैक्षणिक पात्रता/तांत्रिक शिक्षणाची अर्हता तसेच शारीरिक क्षमता असणे आवश्यक राहील.

(३) जाहिरातीस असणारा एकूण प्रतिसाद विचारात घेऊन आवश्यक तेवढ्या (साधारणत: १:५ किंवा १:७ या प्रमाणात) उमेदवारांना शारीरिक चाचणी परीक्षेस पात्र ठरविण्यात येईल.

(४) लेखी परीक्षेकरिता विहित केलेले किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरतील.

**(२.२) मैदानी चाचणी (पुरुषांसाठी)** **(१०० गुण)**

(अ) **<u>१६०० मीटर धावणे</u>** **(३० गुण)**

| १६०० मी. अंतर पूर्ण करण्यास लागलेला कालावधी | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ५ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | ३० |
| ५ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | २७ |
| ५ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | २४ |
| ५ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | २१ |
| ६ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि. ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | १८ |
| ६ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | १५ |
| ६ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | १० |
| ७ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७ मि. ३० सेकंदापेक्षा कमी. | ०५ |
| ७ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

**(ब)** जमिनीपासून ३३ फुट उंचीवरील खिडकीस लावलेल्या (४६.४' वरील उंचीच्या) ॲल्युमिनियम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरणे.(आरंभ रेषेपासून शिडी २० फुट अंतरावर असेल.) **(२० गुण)**

| वेळ (सेकंदामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| २० सेकंदापर्यंत | २० |
| २० सेकंदापेक्षा जास्त ते २५ सेकंदापर्यंत | १६ |
| २५ सेकंदापेक्षा जास्त ते ३० सेकंदापर्यंत | १२ |
| ३० सेकंदापेक्षा जास्त ते ३५ सेकंदापर्यंत | ०८ |
| ३५ सेकंदापेक्षा जास्त ते ४० सेकंदापर्यंत | ०४ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(क) **५० कि.ग्रॅ. वजनाची मानवीय प्रतिकृती खांद्यावर घेऊन दिलेल्या चौकोनी मार्गाने ६० मीटर अंतर धावणे-** (२० गुण)

| वेळ (सेकंदामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| २० सेकंदापर्यंत | २० |
| २० सेकंदापेक्षा जास्त ते २५ सेकंदापर्यंत | १६ |
| २५ सेकंदापेक्षा जास्त ते ३० सेकंदापर्यंत | १२ |
| ३० सेकंदापेक्षा जास्त ते ३५ सेकंदापर्यंत | ०८ |
| ३५ सेकंदापेक्षा जास्त ते ४० सेकंदापर्यंत | ०४ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(ड) <u>२० फुट उंचीपर्यंत रस्सीवर चढणे व उतरणे.</u> (२० गुण)

रस्सी पूर्ण चढल्यास २० गुण, ३/४ (तीन चतुर्थांश) चढल्यास १० गुण, १/२ (अर्धी) चढल्यास ५ गुण तर अर्ध्यापेक्षा कमी अंतर चढल्यास शून्य गुण दिले जातील. (रस्सीवर चढतेवेळी फक्त हाताचा वापर करणे बंधनकारक राहील. पायाचा वापर करता येणार नाही, केल्यास शून्य गुण मिळतील.)

(इ) <u>२० पुल-अप्स</u> (१० गुण)

प्रत्येक पुल-अपला १/२ (अर्धा) गुण, याप्रमाणे २० पुल-अप्स पूर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील.

**(२.३) मैदानी चाचणी- महिलांसाठी** **(१०० गुण)**

**(अ) <u>८०० मीटर धावणे</u>** **(३० गुण)**

| **८०० मी. अंतर पूर्ण करण्यास लागलेला कालावधी** | **द्यावयाचे गुण** |
|---|---|
| २ मि. ५० सेकंदापर्यंत | ३० |
| २ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि. ०० सेकंदापर्यंत | २७ |
| ३ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि. १० सेकंदापर्यंत | २४ |
| ३ मि. १० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि. २० सेकंदापर्यंत | २१ |
| ३ मि. २० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि. ३० सेकंदापर्यंत | १८ |
| ३ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि. ४० सेकंदापर्यंत | १५ |
| ३ मि. ४० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि. ५० सेकंदापर्यंत | १० |
| ३ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त ते ४ मि. ०० सेकंदापर्यंत | ०५ |
| ४ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

**(ब) <u>जमिनीपासून ३३ फुट उंचीवरील खिडकीस लावलेल्या (४६.४’ वरील उंचीच्या) ॲल्युमिनियम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरणे.</u>** **(२० गुण)**

(आरंभ रेषेपासून शिडी २० फुट अंतरावर असेल.)

| **वेळ (सेकंदामध्ये)** | **द्यावयाचे गुण** |
|---|---|
| ३० सेकंदापर्यंत | २० |
| ३० सेकंदापेक्षा जास्त ते ४० सेकंदापर्यंत | १५ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त ते ५० सेकंदापर्यंत | १० |
| ५० सेकंदापेक्षा जास्त ते ६० सेकंदापर्यंत | ०५ |
| ६० सेकंदापेक्षा जास्त | ० |

(क) <u>४० कि.ग्रॅ. वजनाची मानवाकृती खांद्यावर घेऊन दिलेल्या चौकोनी मार्गाने ६० मीटर अंतर धावणे.</u> (२० गुण)

| वेळ (सेकंदामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| २५ सेकंदापर्यंत | २० |
| २५ सेकंदापेक्षा जास्त ते ३० सेकंदापर्यंत | १६ |
| ३० सेकंदापेक्षा जास्त ते ३५ सेकंदापर्यंत | १२ |
| ३५ सेकंदापेक्षा जास्त ते ४० सेकंदापर्यंत | ०८ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त ते ४५ सेकंदापर्यंत | ०४ |
| ४५ सेकंदापेक्षा जास्त | ० |

(ड) <u>गोळा फेक (गोळयाचे वजन ४ कि.ग्रॅ.)</u> (१० गुण)

| गोळा फेकीचे अंतर (मीटरमध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ६ मीटर व त्यापेक्षा जास्त | १० |
| ५.५० मीटर ते ६ मीटरपेक्षा कमी | ०८ |
| ५ मीटर ते ५.५० मीटरपेक्षा कमी | ०६ |
| ४.५० मीटर ते ५ मीटरपेक्षा कमी | ०४ |
| ४ मीटर ते ४.५० मीटरपेक्षा कमी | ०२ |
| ४ मीटरपेक्षा कमी | ० |

(इ) <u>लांब उडी</u> (१० गुण)

| अंतर (फुटामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| १५ फुट व त्यापेक्षा जास्त | १० |
| १३ फुट ते १५ फुटापेक्षा कमी | ०८ |
| ११ फुट ते १३ फुटापेक्षा कमी | ०६ |
| ०९ फुट ते ११ फुटापेक्षा कमी | ०४ |
| ०९ फुटापेक्षा कमी | ० |

(फ) <u>१० पुश अप (जोर काढणे)</u> (१० गुण)

प्रत्येक १ पुश अपला १ गुण, याप्रमाणे १० पुश अप पूर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दिनांक :- १८ फेब्रुवारी, २०२०

दिलीप आ.वणिरे
शासनाचे कार्यासन अधिकारी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.